Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ७, अंक २१] गुरुवार ते बुधवार, जून १७-२३, २०२१/ज्येष्ठ २७-आषाढ २, शके १९४३ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ११.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक-अ—नागपूर विभागीय पुरवणी

(भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ९७.

**मुख्याधिकारी, नगर पंचायत, यांजकडून**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २३(१) [ कलम २१(२) सह ] नुसार पोंभूर्णा नगर पंचायत क्षेत्राची विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर करणेबाबत.**

क्रमांक-न.पं.पों-कार्या.-२०६८–२०२१.—

शासनाने नगर विकास विभागाकडील शासन निर्णय क्र. एमयुएन-२०१४/प्र.क्र. १०१/नवि-१८, दिनांक १७ जून, २०१५ अन्वये पोंभूर्णा नगर पंचायत स्थापन केलेली आहे. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २१(२) अन्वये पोंभूर्णा नगर पंचायत क्षेत्राचा नियोजनबद्ध विकास होण्यासाठी त्या क्षेत्राची विकास योजना तयार करणे आवश्यक आहे.

सबब, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २३(१) [ कलम २१(२) सह ] अन्वये पोंभूर्णा नगर पंचायतीने विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर करण्यासाठी मा. प्रशासक यांचे मंजुरी आदेश ठराव दिनांक १ जून, २०२१ अन्वये मान्यता दिली आहे. त्यानुसार सदरची सूचना प्रसिद्ध करण्यात येत आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २३(२) नुसार पोंभूर्णा नगर पंचायतीच्या विकास योजनेमध्ये समाविष्ट असलेल्या क्षेत्राची हद्द दर्शविणारा नकाशा पोंभूर्णा नगर पंचायतीच्या कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी, कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनासाठी ठेवण्यात आलेला आहे.

ज्या नागरिकांच्या याबाबत काही सूचना/हरकती असतील त्यांनी ही सूचना महाराष्ट्र शासनाच्या **राजपत्रात** प्रसिद्ध होईल त्या तारखेपासून ६० दिवसाच्या आत मुख्याधिकारी, पोंभूर्णा नगर पंचायत यांचेकडे लेखी स्वरूपात द्याव्यात. विकास योजना तयार करतांना त्या सूचना/हरकतींचा योग्य तो विचार करण्यात येईल.

**सिध्दार्थ भ. मेश्राम**,
मुख्याधिकारी,
नगर पंचायत, पोंभूर्णा.

पोंभूर्णा :
दिनांक ४ जून २०२१.

ना.-एक-अ-१ (१५४८).

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ९८.

BY CHIEF OFFICER, NAGAR PANCHAYAT

**Declaration of Intention to prepare Development Plan of Pombhurna Nagar Panchayat u/s 23(*1*) [read with Section 21(*2*) ] of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.**

No. NPP-Desk-2068-2021.—

Government of Maharashtra in Urban Development Department, *vide* its Notification No. MUN-2014/C.R. 101/UD-18, dated 17th June 2015 constituted Pombhurna Nagar Panchayat. It is necessary to prepare the Development Plan for the area of Pombhurna Nagar Panchayat as per Section 21(*2*) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 for Planned Development of the said area.

Hence, the Pombhurna Nagar Panchayat by its Resolution dated 1st June 2021 has given consent to declare its intention to prepare Development Plan, as per provision of Section 23 (*1*) [ read with Section 21(*2*) ] of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966. Accordingly, this notice is being published.

The plan showing boundary of the area included in Development Plan of Pombhurna Nagar Panchayat is kept open for inspection by the public on office working days, during office hours at the office of the Pombhurna Nagar Panchayat, as required under Section 23(*2*) of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966.

Any suggestion/objection of the public in this regards, may be forwarded in writing to the Chief Officer, Pombhurna Nagar Panchayat within a period of 60 (sixty) days from the date of publication of this notice in *Maharashtra Government Gazette.* The suggestion/objection shall be duly considered while preparing the Development Plan.

Pombhurna :
Dated the 4th June 2021.

SHIDDHARTH B. MESHRAM,
Chief Officer,
Nagar Panchayat, Pombhurna.

---

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ९९.

**अध्यक्ष, नगर परिषद, यांजकडून**

क्रमांक नपव-न.रचना-५५७-२०२१.—

वरोरा शहराची विकास योजना नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई, यांचा शासन निर्णय क्र. टीपीएस-२२१२-५२१ (न) पुनर्बांधणी क्र. ५७-प्र.क्र. १०२-१२-नवि-९, दिनांक २८ डिसेंबर २०१२ अन्वये मंजूर झालेली असून ती दिनांक २७ जानेवारी २०१३ पासून अंमलात आलेली आहे.

नगर परिषदेचा सभेचा ठराव क्र. २१, दिनांक २३ मार्च २०२१ अन्वये नगर परिषद, वरोरा यांनी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७ (१) अन्वये उपरोक्त विकास योजना वरोरा मध्ये खाली दिलेल्या तपशीलप्रमाणे किरकोळ बदल करण्याचा प्रस्ताव केलेला आहे.

**तपशील**

| जागेचे वर्णन | क्षेत्रफळ | विकास योजनेतील प्रस्ताव | किरकोळ बदल झाल्यानंतर होणारा प्रस्तावित उपयोग |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| मौजा वरोरा कॉलरी भू.मा.क्र. ६० | ९४६५.०० चौ.मी | आ.क्र. २१- प्राथमिक शाळा<br>आ.क्र. २२- चिल्ड्रेन पार्क | रहिवासी क्षेत्र |

उपरोक्त किरकोळ बदल दर्शविणारा नकाशा व त्यासंबधीचा माहिती होणारा अहवाल वरोरा नगर परिषदेच्या कार्यालयात कामकाजाचे वेळात अवलोकनार्थ उपलब्ध आहे. महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७ (१) अन्वये असे उद्घोषित करण्यात येते की, सदर किरकोळ स्वरूपाच्या बदलासंबंधी कोणाला काही हरकती/आक्षेप असतील त्यांनी हि अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्यापासून

३० दिवसांच्या मुदतीत मुख्याधिकारी, नगर परिषद, वरोरा यांचेकडे लेखी सादर कराव्यात. अशा सूचना व हरकतीवर सदहू किरकोळ बदलाचा प्रस्ताव शासनास पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यापूर्वी योग्य तो विचार केला जाईल.

**अहेतेशाम सदाकत अली,**
अध्यक्ष,
नगर परिषद, वरोरा.

वरोराः
दिनांक ४ मे २०२१.

---

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १००.

BY PRESIDENT, MUNICIPAL COUNCIL

No. MCW-TP-557-2021.—

The Development Plan of Warora Town has been already sanctioned by the Urban Development Department, Mantralaya, Mumbai Government Resolution No. TPS-2212-521(N) Reconst. No. 57-CR-102 (A)- 2012-UD-9, Dated 28th December 2012 and the Development Plan is being implemented from Dated 27th January 2013.

The Municipal Council, Warora has proposed to make minor modification in the aforesaid final Development Plan *vide* Resolution No. 21, Dated 23rd March 2021 as below.

PARTICULAR

| Description of Land | Area | Present Use | Proposed user after Modification |
|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) |
| Mouja Warora Collry Sr. No. 60 | 9465.00 Sq. M. | Site. No. 21- Primary School Site. No. 22- Children Park | Residential Purpose |

The Plan & reports containing the description of the above minor modification can be seen in the office of the Municipal Council, Warora during office hours.

Now, pursuance of Section 37(*1*) of Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 hereby notified that any person having any suggestion or objection to proposed modification as delailed above shall communicate the same in writing to the undersigned within one month from the date on which this notification appears in the *official gazette.*

The objection and suggestion if any received within the above mentioned period of one month will be considered by the Chief Officer, Municipal Council, Warora while submitting the purposed minor modification to the Government for further process.

AHTESHYAM SADAKAT ALI,
President,
Municipal Council, Warora.

Warora :
Dated the 4th May 2021.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.